म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९६५५

# सागरवेलों

१९६७ विद्याधर भागवत



REFBK-0016303
REFBK-0016303

# सागर वेला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८८०१६ वि: काव्य
नोंद दि. १८।९।६६
१८५५

विद्याधर भागवत

REFBK-0016303
REFBK-0016303

दा. क्र. १६३०३

अभिनव प्रकाशन, मुंबई १२.

किंमत अडीच रुपये

प्रकाशक : वामन विष्णु भट,
अभिनव प्रकाशन
७ अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड,
परळ, मुंबई १२.

© विद्याधर भागवत

प्रथमावृत्ति : नोव्हेंबर, १९६७.

वेष्टन : बाळ ठाकूर

मुद्रक : स. कृ. जोशी, मॅनेजर,
विमा मुद्रक आणि प्रकाशक लि.,
सातारा यांचा विमा छापखाना.

माझे वडील ती. कै. दादा
यांचे स्मृतींस–

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८००१६ वि. काव्य
क्रमांक १८८५५ नोंद दि. १६।१।७८

# अनुक्रम


सागर वेला
प्रवास
सहज रेखिता
रोज सकाळी अश्विनातल्या
फकीर नंगा
जगाच्या कल्याणा
मंगल ज्योतीत
केव्हातरी
शहाळी शकुन
गानकल्पिता
गर्भ फुटेल तोवरी
मध उधाणला तरि
स्वर जुळेल, कर दोन्ही
का जाशी......
प्यालो मी कल्पना
पाकळ्या
मंडाले : एक स्मृती
विझली ती आस तुझी–
आषाढाच्या
अशी तुझी ग
वाटेलाही फुटतात डोळे
कर्पुर शिशिराचा
ॐ
अर्घ्य
गात्र गाथा
पापणीत नभ जागे
मंद मी मलूल वाट
माझा नवस मातीचा
तव अबोल हेतू सारे...
इथे क्षितिज
छंदी गालबोट–
रोम व्यथांचे–
अर्धकुंभ
सांज दाटली
भ्रमंती
गात्रात क्षितिज
वेड
चित्र १
चित्र २
सुवासिनी
गौळणी उन्हाच्या
एक लिहावी कविता
मूठभर उरलेली
हसत ओठ–
मधे हिवाळी रात्र
चैत्रलज्जा
ओंजळीत एक रात्र
आज तुला
पाप
अर्थ
रक्तारक्ताच्या नात्याचा
मीरा
आता मीच माझे नभ
अश्रुपंख
विद्ध शय्या
बेहोष रात्र
आज मी माझ्यात नाही
प्राणांची प्रार्थना :
मृत्यूच्या पंगू चाली
पहिलेपण
असले जगणे देई देवा
अन्यायाच्या महासागरात
गीताचे सुख
तम केव्हाचे
भिक्षा

# प्रस्तावना

'सागर वेला' हा श्री. विद्याधर भागवत यांचा पहिला कवितासंग्रह. कवितेच्या संदर्भात 'पहिला' या शब्दाला विशेष अर्थ असतो असे नाही. पहिला संग्रह कवितेच्या विकासाची पहिली अवस्थाच नेहमी दर्शवितो असे म्हणता येत नाही. कवितेचे परिणत, किंवा जवळजवळ परिणत असे स्वरूप त्यातून अनेकदा प्रगट झालेले दिसून येते. कित्येक गवयांप्रमाणे कित्येक कवींनाही आपला 'सूर' चटकन् आणि विनासायास सापडतो आणि या षड्जावर आधारलेली विविध स्वरांची आंदोलने रसिकांचे मन आल्हादित करतात. कोकणाच्या निसर्गरम्य वातावरणात आणि समुद्राच्या सहवासात फुललेली ही 'सागर वेला', कवीला आपला आधारभूत षड्ज सापडला आहे याची साक्ष देत आहे असे मला वाटते.

कोकणाच्या आणि समुद्राच्या सान्निध्यात या कवितेचा संसार उभा राहिलेला असला तरी नाटकातील पडद्याप्रमाणे ही पार्श्वभूमी या काव्याच्या पाठीशी विलगपणाने कोठे उभी असल्याचे आढळत नाही. ती काव्यात नव्हे, कवीच्या मनातच मिसळून गेली आहे, त्याच्याशी एकजीव झाली आहे. त्या सौंदर्याची तरलता प्रतिमांच्या द्वारा नव्हे तर अनुभवांच्या द्वाराच येथे व्यक्त होते :

> माझ्या डोळ्यांच्या शिडास
> हवे थांबायाला थोडे . . .
> . . . . . . . .
> मौन हुंकारे केळफुलातील
> रान केवडा होतो आतुर पहावयाला
> जंतरमंतर जाळीमधले —

अशा शब्दातून हे तरल सौंदर्यानुभव कवीने बांधून टाकले आहेत.

मानवी भावनांचा सरळ, उत्कट, हृदयाला स्पर्श करणारा आविष्कार सध्याच्या 'नव' म्हटल्या जाणाऱ्या कवितेत दुर्मिळच असतो. भोवतालच्या

परिस्थितीशी, व्यक्तीशी अथवा संस्थांशी असलेले माणसाचे संबंध आज बदलत आहेत काय ? या संबंधांच्या रूपरेषेत काही परिवर्तन घडून येत आहे हे खरे. परंतु कितीही परिवर्तन झाले तरी माणसाच्या काही मूलभूत प्राथमिक प्रवृत्ती कायमच राहतात. सरळ, रसोत्कट भावानुभवांचे दर्शन अलीकडील काव्यात फारसे होत नाही याचा संबंध परिस्थितीतील परिवर्तनापेक्षा आविष्काराच्या नवीन पद्धतीशी अधिक आहे. आरशावर पडणारे ऊन बांधीव स्वरूपात परावर्तित होते. पाण्यावर पडणारे ऊन मात्र त्यात मिसळून प्रकाश छायेची एक अस्पष्ट, गुंतागुंतीची आकृती तेथे निर्माण करते. तसेच काहीसे या आविष्कारपद्धतीचे आहे. तिचा भर, विशिष्ट परिस्थितीतून निर्माण होणारी विशिष्ट प्रतिक्रिया व्यक्त करण्यापेक्षा त्या परिस्थितीने उत्पन्न झालेली धूसर मनस्थिती व्यक्त करण्यावर जास्त असतो. ही धूसरता शब्दात चांगली पकडता आली नाही म्हणजे त्या असफल प्रयत्नातुन क्लिष्टता किंवा दुर्बोधता निर्माण होते. श्री. भागवत यांनी या नवीन आविष्कार पद्धतीचा स्वीकार केला असून तिच्या योजनेत ते बरेच यशस्वी झाले आहेत यात शंका नाही. अनेक काव्यातून कवीच्या मनस्थितीचे धूसर परंतु मनोवेधक दर्शन आपल्याला होऊ शकते. रोज सकाळीं, जगाच्या कल्याणा, केव्हा तरी, गानकल्पिता, गर्भ, आज मी, भिक्षा, मंडाले, पाकळ्या, अर्थ, या सहज लक्षात येणाऱ्या कवितांचा या दृष्टीने उल्लेख करावासा वाटतो.

सांज दाटली नदीत मंद हळद रंगली — अशा ओळी पाहिल्यावर या कवितेचे बोरकरांच्या काव्याशी नाते आहे असे वाटते. केव्हा तरी ते असेलही. सौंदर्याचा आविष्कार सुंदर शब्दात व्हायला हवा ही कोकण–किनाऱ्याचीच मागणी असावी. असे शब्दांचे आणि त्यांना बिलगणाऱ्या प्रतिमांचे सौंदर्य व नितळपणा संग्रहातील अनेक कवितात जाणवतो :

अभ्रबिलोरी उबेत
दुःख रोज सोशी
मंद मोतिया चुरात
रुग्णाईत उशी.

.........

ईश्वर म्हणजे सागर तेव्हा असे मानले
तरीहि त्याला काठच होता—माया होती
अस्तित्वाचे जाळे बनले असे ऐकले
त्यातुनि दिसली काळालाही क्षतेच होती.

पण कवीने आपल्या मुशाफरीची दिशा आता बदललेली आहे असे वाटते.

जेव्हा नसते नाते शब्दांचे शब्दाशी
मी बसतो उघडून खिडकी
माझ्या रूपाची

शब्दांच्या पलिकडे असलेले अर्थही शेवटी शब्दांतच बांधावे लागतात. पण पलीकडे जाण्याच्या या प्रयत्नातही एक धुंद असते. आणि तो यशस्वी झाला तर सर्वसामान्यापेक्षा रसिकाला तो पुष्कळच अधिक देऊ शकतो. श्री. भागवत यांची पुढील वाटचाल अशीच यशस्वी होईल असा मला विश्वास वाटतो.

**वि. वा. शिरवाडकर.**

# शिवास्ते पंथानः

श्री. विद्याधर भागवत हे नाव गेल्या दहा वर्षात साहित्यप्रेमी वाचकांच्या परिचयाचे झाले आहे. 'सत्यकथा', 'माणूस', 'महाराष्ट्र टाइम्स' इत्यादी नियतकालिकातून त्यांच्या कविता आणि कथा रसिकांपर्यंत जाऊन पोचल्या आहेत. अशा रीतीने वाचकांशी पूर्वपरिचित असलेल्या लेखकाला नव्या परिचयाची काही आवश्यकता नाही. पण काही काही जुन्या रूढी मोठ्या चिवट असतात; त्या थोड्याशा वाकतात पण पूर्णपणे कधीच मोडत नाहीत. विवाहविषयक चालीरितींच्या बाबतीत हा अनुभव आपण घेतच आहोत. साहित्यक्षेत्रही त्याला अपवाद नाही. पन्नास साठ वर्षे होऊन गेली तरी साहित्यात ग्रंथरूपाने पदार्पण करताना किंबहुना तिथे आपल्या चार पाउलांच्या खुणा उमटविल्यानंतरही लेखकाला अन्य कुणाच्या तरी भलावणीची अद्यापि आवश्यकता भासते.

श्री. भागवत यांच्या 'सागर वेला' या छोट्या काव्यसंग्रहाला मी हे प्रास्ताविक दोन शब्द लिहीत आहे ते यामुळेच. वस्तुतः गेल्या दहा वर्षातल्या मराठी कवितेचं माझं वाचन फार अपुरं आहे. दृष्टी आणि प्रकृती यांच्या प्रतिकूलतेमुळे वाचनाच्या बाबतीत मी फार परावलंबी झालो आहे. त्यामुळे अलीकडची कविता मी अधूनमधून वाचीत असलो तरी तिचे स्पष्ट असे चित्र माझ्या मनापुढे नाही. या संदर्भात १९२६ सालची एक गोष्ट मला आठवते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्याबरोबर तात्यासाहेब केळकरांच्या घरी त्या वर्षाच्या मे महिन्याच्या सुट्टीत मी उतरलो होतो. पन्नाशी आणि साठी यांच्या मध्यभागी उभे असलेले त्यावेळच्या पिढीतील ते दोघे अग्रगण्य साहित्यीक होते. रात्री जेवणे झाल्यानंतर त्यांच्या गप्पागोष्टी सुरू होत. प्रसंगी मध्यरात्रीपर्यंत रंगत. त्या गप्पागोष्टीत त्यावेळच्या नव्या साहित्याचा विषय आला म्हणजे केळकर माझ्याकडे वळून म्हणत, " तुम्ही हल्लीचे नवे लेखक ! संख्येने पुष्कळ झाला आहात ! शिवाय तुम्ही लिहिताही विपुल. त्यामुळं आता प्रकाशित होणाऱ्या सर्व साहित्याशी साधा परिचय-सुद्धा राखणं आमच्यासारख्यांना मुष्कील होऊन बसलं आहे. " केळकरांचे ते शब्द साहित्यक्षेत्रातलं एक व्यावहारिक सत्य स्पष्टपणे सांगणारे

असले तरी त्या सत्याची प्रचीती मला येऊ लागली ती गेल्या दहा पंधरा वर्षांतच.

असं असूनही या काव्यसंग्रहाविषयी दोन शब्द लिहिण्याचं धाडस मी करीत आहे ते दोन कारणांनी. श्री. भागवत यांना ते विद्यार्थीदशेत असल्यापासून मी ओळखीत आहे आणि त्यांच्या कवितात निरनिराळ्या रूपांनी जी सृष्टी प्रतिबिंबीत झाली आहे तिच्याशी मी चिरपरिचीत आहे; त्यामुळे साहित्यप्रेमाच्या अंकुरांचं पोषण होण्यासारखी परिस्थिती ज्या भागात नाही तिथे राहून श्री. भागवत यांनी काव्यशक्तीची उपासना आणि जोपासना कशी केली असेल याची मला पूर्ण कल्पना करता येते. वालावल, सावंतवाडी, देवगड, बांदे या दक्षिण कोकणातल्या लहानमोठ्या गावांच्या परिसरात श्री. भागवत यांचे शिक्षण झाले. शिक्षकाचा पेशा पत्करल्यानंतरचे त्यांचे जीवनही याच भागात गेले आहे. या भागात नवीनवी मराठी, इंग्रजी पुस्तकं मिळणं कठीण. साहित्यविषयक गप्पागोष्टीकरता समानशील रसिक मिळणेही कठीण. त्यामुळं उदयोन्मुख लेखकाला अशा आडबाजूच्या गावी राहून मनासारखी साहित्याची सेवा करणे किती कष्टप्रद होतं याचा पूर्ववयात मी अनुभव घेतला आहे. अशा ठिकाणी साहित्याचा नुसता छंद असून भागत नाही. त्याचं वेड असेल तरच लेखक टिकू शकतो, प्रगती करू शकतो. "सागर वेला"मधील सुभग रचना आणि सुंदर कल्पना यांच्या मागं श्री. भागवत यांची वाङ्मयीन तपस्या आहे हे दिग्दर्शित करण्याकरता मी या गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करीत आहे. भावकाव्याची विषयवार वाटणी करणं अरसिकपणाचं आहे हे मी जाणतो; किंबहुना कोणत्याही ललितकृतीचं रसग्रहण हा विषय, ही शैली, या कल्पना, या भावना, अशा रीतीने तुकड्या तुकड्यांनी करणं म्हणजे त्या ललितकृतीच्या निम्याशिम्या सौंदर्याला पारखे होण्यासारखे आहे याचीही मला पूर्ण कल्पना आहे. साहित्यविषयक कलाकृती म्हणजे दगडावर दगड ठेवून सिमेंटने सांधलेली एक भिंत नव्हे. ती वेलीवर उगवणारी आणि आपल्या स्वभावाप्रमाणे फुलणारी, रंगरूप दर्शविणारी आणि सुगंध देणारी कळी आहे; त्यामुळे कविता असो, कथा असो, नाटक असो वा कादंबरी असो, त्या त्या कृतीचा रसिक मनावर कोणता एकसंध परिणाम होतो याला ललितलेखनात फार महत्त्व आहे. या परिणामाचं

वर्णन माधवराव पटवर्धन मोठ्या चपखलपणाने एका इंग्रजी शब्दात करीत असत. " Haunting " हा तो शब्द होय. सुंदर ललितकृती वाचल्यानंतर अगर पाहिल्यानंतर माणसाची स्थिती झपाटल्यासारखी झाली पाहिजे. असं साहित्य वाचल्यानंतर मध्यंतरी काही काळ लोटला तरी त्याची विस्मृती होता कामा नये. उलट त्याच्या स्मृतीने मन बेचैन झालं पाहिजे. त्या ललितकृतीचा पुन्हा आस्वाद घेण्याची इच्छा मनात प्रबळ झाली पाहिजे असं माधवराव त्या एका शब्दानं सुचवीत असत.

" सागर वेला "मध्ये दक्षिण कोकणातल्या सौंदर्याचं भांडार असलेल्या बहुविध निसर्गाचं सुललित शब्दांनी रेखाटलेलं चित्र आहे पण ही क्षणचित्रं केवळ सुटी अशी नाहीत. काही थोड्या कवितात सुंदर निसर्गाचं निखळ चित्रण असलं तरी कवी; सागराचं, विविध ऋतूंचं, वृक्षवेलींचं आणि आकाशापासून पृथ्वीपर्यंत सर्वत्र पसरलेलं कामरूपिणी सृष्टीचं जे सौंदर्य आहे त्यात न्हाऊन निघाला आहे याची जाणीव वाचकाला तत्काळ होते; पण " रोज सकाळी अश्विनातल्या " किंवा " गवळणी उन्हाच्या " अशा कवितात त्यानं टिपलेलं भोवतालच्या सृष्टीतील विविध सौंदर्याचं दर्शन बालकवी किंवा बोरकर यांच्या अशा प्रकारच्या कवितांची आठवण करून देणारं आहे.

मात्र अनेकदा त्यांच्या मनात प्रतिबिंबित झालेली ही सृष्टी प्रीतीच्या विविध अनुभूती सांगताना मनोरम प्रतिमांच्या द्वारे प्रगट होते. किंबहुना या काव्यसंग्रहातल्या अनेक कवितांना जो गोडवा आला आहे तो सृष्टी आणि प्रीती यांच्यातील विविध स्वरसौंदर्यांच्या संमिश्रणातून निर्माण झाला आहे. भागवतांच्या अनेक कवितात या दोन गोष्टी भिन्न अशा करताच येत नाहीत. " गानकल्पिता ", " कां जाशी ? ", " पाकळ्या ", " विझली ती आस तुझी " अशा किती तरी कवितात या संमिश्रणाचा वाचकाला सुखद प्रत्यय येतो. " पाकळ्या "मधील पुढील ओळी या दृष्टीने पाहण्याजोग्या आहेत—

" तुझ्या माझ्या स्वप्नांच्या ग
झाल्या चांदण्या सुरेख
भिक्षा घालाया नभास
करूं ओंजळी अनेक."

" माझ्या मेघास फुटल्या
लाख पानांच्या डहाळ्या
आतां मातीच्या ओठांनी
किती टिपाव्या पाकळ्या !

कवीचं जीवन आणि त्याची प्रतिमासृष्टी यांच्यातला अतूट संबंध बोरकरांप्रमाणं भागवतांच्याही कवितेत दिसून येतो. बोरकर मध्यंतरीच्या काळात अनेक वर्षे मोठ्या शहरात राहिले आहेत पण त्यांची प्रतिमासृष्टी मात्र पूर्ववयातल्या दृढमूल झालेल्या सुंदर अनुभूतींच्या कक्षेतच वावरत असते. ज्यांचं पूर्वआयुष्य ग्रामीण भागात गेलेलं आहे असे आमच्याकडील अनेक कवी, कथाकार, कादंबरीकार उत्तरवयातही त्या पूर्व अनुभूतींची निर्मितीच्या निमित्ताने पुनर्रचना करीत असतात. असं होण्याचं कारण मला एकच वाटतं; पूर्ववयातले संस्कार उत्तरवयातल्यापेक्षा फार प्रबळ असतात. त्यामुळे अनेक लेखक उत्तरवयातही पूर्ववयातील अनुभूतींच्या भोवतीच पिंगा घालीत राहतात. एका मर्यादेपर्यंत हे स्वाभाविकही आहे. पुढंपुढं त्याचं रूपांतर एक प्रकारच्या साच्यात होतं. भागवत आज काव्य मंदिराच्या सभामंडपात उभे आहेत. त्या मंदिराच्या गाभाऱ्यात ते यथाकाल जातील ! पण तिथे त्यांचा प्रवेश होईल त्यावेळी त्यांच्या कवितेत हा एकसुरीपणा दिसू नये, तिच्या कक्षा सर्व दृष्टींनी रुंद व्हाव्यात म्हणून या गोष्टीचा उल्लेख मी इथे करीत आहे. यंत्रयुग आलं आहे, जीवन धावपळीचं झालं आहे; एकेकाळी निश्चित स्वरूपाच्या वाटणाऱ्या अनुभूती तेरड्याप्रमाणे रंग बदलत आहेत. अशा संक्रमणकाळात हार्टक्रेन म्हणतो त्याप्रमाणे सारी नवी बाह्यसृष्टी कविप्रतिभेला आत्मसात करता आली पाहिजे.

"सागर वेला"मधे नाद आणि लय यांची भागवतांना असणारी जाण लक्षणीय आहे. त्यांच्या शब्दकळेला कांही विशेष शब्दांविषयी खास प्रेम असले तरी तिचं माधुर्य मनोहार्य आहे. त्यांची प्रतिमासृष्टी काही प्रतिमांच्या थोड्याशा फरकानं होणाऱ्या वापरामुळे मर्यादित भासते परंतु जी भावस्थिती वर्णन करण्याकरता त्यांची कविता अवतरते तिचा सुंदर आविष्कार त्यांची प्रतिमासृष्टी करू शकते. मात्र सुंदर व सरस यात जे अंतर

आहे ते भागवतांनी आपल्या पुढील लेखन प्रवासात जाणून घेतल्यास आणि "मंडाले...एक स्मृति", "जगाच्या कल्याणा", "असले जगणे देई देवा" इत्यादी कवितात त्यांच्या कविमनाची जी बाजू प्रगट झाली आहे तिचा विकास झाल्यास कवियश दुर्लभ वाटण्याचे त्यांना कारण नाही.

आज मराठीत काव्याला फार मर्यादित वाचकवर्ग आहे. जो आहे तोही पुण्यामुंबईसारख्या शहरात! भावनेला नकळत बधिरता आणणाऱ्या शहरी जीवनातल्या यांत्रिक संस्कृतीत वाढणारे कवी आणि काव्याचे वाचक यांचा भर पाश्चात्य देशात होणाऱ्या नवनव्या काव्यप्रयोगांवर, विविध बौद्धिक क्लृप्त्यांवर आणि कसरतींवर व कला केवळ आत्मनिष्ठ असते या अर्धसत्यावर असतो. सुदैवानं भागवत अशा ठिकाणी राहत आहेत की तिथं सामान्य मनुष्याच्या भावभावना, आशाआकांक्षा, सुखदुःख आणि आवडीनिवडी, यांना कविमनाशी जोडणारा पूल उध्वस्त झालेला नाही. त्यामुळे नव्यात जे काही चांगलं असेल त्याचा स्वीकार करूनही आपली कविता जनमानसापर्यंत पोचिवणं त्यांना अशक्य वाटू नये! पुढचा प्रवास अवघड आहे. भागवत तो जिद्दीने करतील आणि उच्चभ्रू रसिकांप्रमाणं सर्वसामान्य रसिकांनाही संतुष्ट करण्याचे सामर्थ्य त्यांना लाभेल अशी मला आशा आहे. हा पुढील प्रवास त्यांना यशःप्रद होवो असे मी मनःपूर्वक इच्छितो.

पुणे
११-१०-६७

वि. स. खांडेकर.

# सागर वेला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 96303
शाखा (स्थूल प्रत)

सागर वेला.... सागर वेला—
धुंद हवेला पीळ पडे ग ऽ पीळ पडे

दुधाळ डोंगर.... दुधाळ डोंगर
अनंतातुनी नाद झडे ग ऽ नाद झडे

झुंबर पिळुनी पुळणी ओली
पुळणी ओली— सभोवती नभ मोत्याचे

अता कुठे पण युगे संपली
युगे सरकली– शरीर झाले तेजाचे

मंदिर.... मंदिर झाले डोळा
कळस गळाला– रात्र विसरली तालतुरे

मन न्हाले ग ऽ मन ओले ग ऽ
कुंतल कुरळे – सैल मोकळे सोन झरे

सागर वेला .... सागर वेला —
धुंद हवेला पीळ पडे ग ऽ पीळ पडे

मी – तू मिळुनी नभास झेलू
तनू तनूवर सूर–सुखाचे वळ उघडे !

१९६५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा...

## प्रवास

दूर हंबरे किनारा
नभ पाठीवर अडे
माझ्या डोळ्यांच्या शिडांस
हवे थांबायाला थोडे

टिंब.... टिंब आठवण
झाली ओझे साकळता
कुठे चुकचुके तम
गाणे संपता संपता

रक्त घ्यावे आडोशाला
तरी उबारा येईना
ओटी पोटास आलेला
प्रश्न डोळ्यात मावेना

दिशा–दिशा प्रश्न झाले
स्पर्श साहीना कोठेही
माझ्या पावलांची आता
मला सोबतही नाही

बारा वाटांचा प्रवासी—
तसू तसू ओलांडिता
दिशा पंकात रुतली
काटा शोधिता शोधिता

....आता सहस्र हातांनी
तोंडे घ्यावीत झाकून
आणि डोळ्यांनीही घ्यावे
माझ्या हातांचे आव्हान !

१९५८

## सहज रेखिता

सहज रेखिता ओळ कशाने....
तिरपी भुवई, रेखिव डोळे
कमळकळी सम
रेख एकली शोधित येते
अधर खालचे-
व्याधशरासम
आणि वर्तुळे अस्फुट.... रेखिव

सहज रेखिता
ओळ सांधते
कोर बिथरते ढगा आडचा
नूर पाहुनी
पूर येतसे टिंबांनाही
नील पटावर

सहज रेखिता ओळ बोलते
रंग फेकुनी निळसर.... गहिरा —
— रेख मागची पुसून घ्यावी
समोर रेखा तुझी पहावी !

१९५६

# रोज सकाळी अश्विनातल्या

रोज सकाळी अश्विनातल्या
येते शंका तीळ फुलाला
अन् देठातुन मिळते उत्तर दवबिंदूचे....

आकाशातुन प्रश्न लोंबतो
शुभ्र धुक्याचा केळिबनावर,
अन् पदरातिल हिरव्या .. झिळघ्या

मौन हुंकरे केळ फुलातिल.
रान केवडा होतो आतुर पहावयाला
जंतर-मंतर जाळीमधले—

खडका जवळी झुलवी खांदा
बालआवळी कचभाराने...

रोज सकाळी अश्विनातल्या
हे सारे घडते नकळत,
नकळत घोटाळत
उभ्या उभ्याने वळीव वळते....

तीळ फुलांच्या गालांवरुनी
अल्गद फुंकित... सुचवित काही
सकाळ ओलेती पळते —

अन् तिळफुलाला
उत्तर सुचते
पिवळ्या कोशामधले !

१८५६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
८८०९६

## फकीर नंगा

आज वारा घोरतो आहे —
अवकाशाच्या खिडीतून
राठ धुराची धुरकट भालू
रडून.... कु – हू – न

काळोखाला चिरते आहे . . .
कुंदपणाच्या फांद्यावरती
वखवखलेली रात्र-वाघळे
आळसलेला वृद्ध काळ
मोजतो आहे ....

नक्षत्रांचे खडे हुंगून
विज बिचारी
शिकते आहे

मस्तावलेला सुस्त पाऊस
गर्द ढगांच्या गादी वरती
ढेकर देत
लोळतो आहे

पहाडातला फकीर नंगा
गुढग्यामध्ये मोडुन मान
जीवनस्मरणी ओढतो आहे ....
आज वारा घोरतो आहे.

१९५६

## जगाच्या कल्याणा

जगाच्या कल्याणा
काटयांचा मुगुट
झाले कासावीस कूस–ब्रह्म

माझ्याच कल्याणा
मीच होतो काटे
शोधताना भेटे शेजधर्म.

माझ्या वाटेवरी
मीच होतो डोळा
मलप्यांत रक्त साठवून.

ऐसे हे आकाश
माझेच रे पाश
कशास आक्रोश नेत्रांतुन ?

आता जगणेच
तरी जगो द्यावे
आणि फुलू द्यावे मृत्यूभोती.

१९६४

## मंगल ज्योतीत

सहस्र दीपांच्या तेजे न्हाऊन
मंगल ज्योतीत गेलां विरून

एकेक पाऊल
बांधून ध्येयात
शरीर संपले
चंदनी थाटात
कणात–कणात सुगंध भरून
मंगल ज्योतीत गेला विरून.
त्यागाच्या कोंदणी कुंकुम तिलक
लाविला तुम्हीच
शान्तीच्या तालात अभंग गायन
गायिले तुम्हीच

नवीन संतांच्या
बसून छायेत
नवीन वेदांची
सुराट गर्जत
सागर नादात गाऊन गाऊन
मंगल ज्योतीत गेला विरून

डोंगर पहाडी मृदंग वादन
केलेत तुम्ही
पाताळी फणींद्र झुलत गुंगत
ठेविला तुम्ही

विष्णूच्या नाभीत
क्रान्तीस रोवून
ब्रह्माच्या हातात
जीवन ठेवून
तीनही जगांत उरला भरून
मंगल ज्योतीत गेला विरून.

नभाच्या अंगणी मंगल धाम
बांधिले तुम्हास

ताऱ्यांचे सहस्त्र पवित्र नयन
दिधले तुम्हास

भारत रणांचे
रक्ताचे लेख
अनेक युगांची
अतृप्त भूक

देवांस तेथून गाऱ्हाणी गाऊन
मंगल ज्योतीत गेला विरून.

१९५५

# केव्हातरी

केव्हातरी.... केव्हातरी
जेव्हा नसते नाते शब्दांचे शब्दाशी
मी बसतो उघडून खिडकी
माझ्या रूपाची....

स्वप्नाळू काळोखाच्या चौकटीत
भासांचे गज सळसळतात
आणि उजाड मनाची किमया
पंख होऊन इवलासा उडून जाते.

आता—
एका नाजुक स्मृतीच्या कलाबतूने
जरी मला हेलावले असते,
मी विरून गेलो असतो....
नादाच्या प्रणवावरील
भावनांची टिंबे हादरली असती
त्यातूनही मी ठिबकत राहिलो असतो....

शब्दांच्या झिणझिण्या
रस–गंधमय झाल्या असत्या
अतृप्तीच्या पिसावर बसून
आत्म्याने आत्म्याचेच
हृदयंगम स्वप्न पाहिले असते

त्या स्वप्नाच्या लयीत
विश्वस्पर्शी रूप होऊन
हुंकारले असते
काळोखाची चौकट फोडून—

....आणि कुठेतरी सुरू झाली असती
आत्म्याचीच तालबध्द ऋचा
विश्वाला प्रसवणारी....

१९५८

## शहाळी शकुन

धुंद गारवा रेंगाळे
लहरीत निळ्या
लाख फेसाळ कुर्वाळी
पुळणीत कळ्या

उठे मधाळ तंद्रीत
रंग सोनसळी

गंध बेभान धावला
केतकीच्या तळी

स्वप्न रेखल्या डोळ्यांनी
स्तब्ध निळाईत

फिरे मासोळी एकटी
जळी नखऱ्यात

बाकदार खांदा आणि
चुडेदार हात,

आज कातीव सोलिया
वेगळ्या थाटात

अशी सकाळ केशरी
उमलून पारी—

आज शहाळी शकुन
कार्तिकाच्या दारी !

१९५६

## गानकल्पिता

मदन महाली मंद पहाटे
अनंगमुग्धा फुलसर पिवळी
केवड्यातली
कशास होउन आलिस तू ?

अन् रेखांकित
स्वप्न मनीचे दवबिंदूवर
कशास बसलिस कोरित तू ?

धुंद घनाच्या
केश मधुवनी मयुर पिसारा
कशास फुललिस बहरुन तू ?

अन् पाऱ्यावर
रान झऱ्याच्या
कंच कुंचला अल्गद फेकुनि
झुळुक कशाला नेलिस तू ?

आणिक उमलत
भाव विराणी
क्षितिजावरची गानकल्पिता
कशास बनलिस अखेर तू ?

१९५७

# गर्भ फुटेल तोवरी

फूल मागते देऊळ
शेज वठलेली राही –
इथे काटचास वाटते
झाड पेलणार नाही

झाड पेलणार नाही
गंध झोकणार नाही
हाडामांसाची सावली
इथे झुलणार नाही

काटचा – वाटचास झुरणे
सांज उरी पांघरणे
लाजवेलीसाठी फक्त
डोळे पुसत राहणे

गर्भ फुटेल तोवरी
माती सोशीत राहावे
किंवा सुक्या आरतीत
वात सारीत बसावे !

१९५७

# मध उधाणला तरि

सामावुन घ्यावा कवेत नभसंभार
बेहोष तमाला लोटुनि दाहि दिशांना
तुज उजळिता बघावी
शिखण्याच्या मखण्याने
चालीत पुन्हा लावण्यवेल नटताना

काठावर जेव्हा निद्रित ही घनमाला
अन् गंधविराणी किनार आडोशाला
दर्पणी निळीच्या
बावरता हिमज्योत्स्ना
नुपूर खुडाया सवय तुझ्या हाताला

चघळीत तृप्तिची पहाटशिल्पी स्वप्ने
नभ-राधा येते सावरताना शेला–
तो पुसट राहिला
रंग तिच्या स्वप्नांचा
सुखसिक्त पापणी आतुरते टिपण्याला

आवरिता कुंतल सुगंध रुततो हाता
अन् जाग मधाची ओठांनाही खुपता,
हे शरीर अवघे
लाख सुरांनी भरते
कुणि लकेर उल्का तम कुर्वाळुनि जाता

या अशा समेवर नृत्य तुझे मन्दावे
लावण्य लपेटुन लाख दिवे कवळावे
मध उधाणला तरि
हवा दंश चोचीचा –
या अशाच दुखऱ्या तृप्तीतून विरावे !

१९५८

## स्वर जुळेल, कर दोन्ही

मी जपतो तरि माझे बळ काही नच पुरते
अर्ध्यातुन आकाशी वीज जशी कोसळते
ठिणगीचे भाग्य मुळी माझ्यातुन नच उमले
गात्राचे काव्य कधी त्यातुनही नच फुलले
अवेळीच संध्येची भैरवि का जागविते
मी जपतो तरि माझे बळ काही नच पुरते.

अंकुरत्या स्पर्शाने पंखहृदय पालवता,
कोसळत्या मेघांनी धरा-नेत्र ओघळता,
मी न मुळी रोमांचित-अग्नीतिल राख जशी
दिवसाच्या वणव्यातुन होरपळे रात जशी
स्वप्नांच्या डंखातुन सुंदरता नच भिनते
मी जपतो तरि माझे बळ काही नच पुरते.

एकदाच हेलाविन दाहि दिशांची हृदये
नील अभ्र गात्रातुन उमलावी स्वरवलये
गंधातिल सोन झरे, नादातिल रंगतुरे,
श्रावणघन झंकृतिची तरळावी लयनुपुरे

... स्वर जुळेल, कर दोन्ही पण तुटले आळविते
मी जपतो तरि माझे बळ काही नच पुरते.

१९६३

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... दि: ...

## का जाशी....

का जाशी ....
संध्येच्या स्मितहळव्या मेघापरि –
का जाशी . . .

दिवस कुशी वळताना
पुळणीवर फेनाची
लाख फुले चुरताना,
खडकावर मातीची
लाज जरा फुटताना,

स्वातीच्या थेंबापरि
नयनातिल बिंदु तुझे टिपताना
वाऱ्याच्या जखमेवर
रक्ताचे शब्द तुझे असताना

का जाशी –
ऐकवीत डोळ्यांचे
गान छुपे डोळ्यांना
का जाशी फांदीपरि

अंतर मुळी नसताना
तूहि तुझी नसताना
संध्येच्या स्मितहळव्या मेघापरि . . .

१९५७

# प्यालो मी कल्पना

पद्मचित्र कोरतो दवाने मोत्यांचा गारवा
तीळफुलांवर मकरंदाचा मेघ उतरतो नवा

नीलपऱ्यांच्या ओठांवरती रुते कमळवेल
लहरींच्या भर्जरी मनातिल नभ उमटे खोल

जुईस्वप्न पंखात घेउनी कुठे शिंपला झुरे
कुठे मखमली जाग उरावी तशी पापणी फिरे

लज्जेच्या गिरकीस फुटावी वेलफुले केशरी
तशी उमटते वाट सांडता माळावर कस्तुरी

आता कुठे उसवली कुशीतिल स्वप्नगौर वेणा
अभ्राने गात्रात गोंदता प्यालो मी कल्पना !

१९६०

# पाकळ्या

माझा मेघ.... तुझे पान
कथा एकमेकां सांगू
तुझ्या माझ्या गिरकीत
दोघे भोवळून रंगू

मीही नाही.... तूही नाही
जग सैरावैरा झाले
चार डोळ्यांचे पतंग
दिशा कातरून गेले

तुझ्या माझ्या स्वप्नांच्या ग
झाल्या चांदण्या सुरेख
भिक्षा घालाया नभास
करू ओंजळी अनेक

माझ्या मेघास फुटल्या
लाख पानांच्या डहाळ्या
आता मातीच्या ओठांनी
किती टिपाव्या पाकळ्या !

१९६२

## मंडाले : एक स्मृती

थरथरले आकाश, आणखी
चमक विजेची बावरली,
वज्रकरांतुन लाख अक्षरे
....दगडांना भाषा फुटली

कणाकणातुन साठविले मन
श्वास पेरिले चिऱ्यातुनी—
इथे जन्मले नवे वेद अन्
इथे नवी अक्षरवाणी

क्षितिज पेटता विरघळले नभ
खळबळ झाली दिशांतुनी
नभात भरल्या हुंकाराने
रोमांचित झाली धरणी....

नव्हती कारा.... नव्हते कैदी,
नव्हत तिथे मालक-दास
विराट मानव या देशाचा
बदलुनि गेला इतिहास !

या देशाची दीर्घ कहाणी
ऐकण्यास मानव दुबळा
कशास मूर्ती.... कसले पुतळे....
पहायला जर नच डोळा ?

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९६३०३

नद्यात केवळ अश्रू भरता
नवा किनारा फुलवाया--
निसर्ग नकली, तिथे क्षितिजही
येइल कैसे उतराया ?

अशा खिन्नशा अंधाराला
नवी वाट दाखविण्यास--
मंडालेची स्मृती कोरते
या देशाचा इतिहास !

१९६२

# विझली ती आस तुझी –

विझली ती आस तुझी
मन माझे नच निवले
आधरांना शापच की
मेघ मधाचे फुटले

होतिस तू धुंद उभी
शपथ घेत भरतीची
होतिस तू वीज जशी
कोसळत्या मेघांची

होतिस तू गंधाची
स्मितरेषा कोसळती
होतिस तू देणारी--
देताना डुचमळती

हे सारे देताना
चंद्र निघे ओसंडुन
रात्रीच्या पापणीत
नीज जशी ओथंबुन

हे सारे सरताना
क्षितिज इथे चुकचुकले;
विझली ती आस तुझी
मन माझे नच निवले

१९६५

# आषाढाच्या

आषाढाच्या ढगांपरी तू
गेलिस निखळत
जपुन उराशी हिरवे स्पंदन
अधिऱ्या ओठी गीत ठेवुनी
जलबिन्दूंचे
सावरीत तू क्षितिज ओढणी
गेलिस अवचित
ठेवुनि भवती आर्त फुलांच्या
दीन चांदण्या....
दान दिले तू
अश्रूंचेही वाऱ्यावरती
आणिक ओली भुई सरकली
लाटाखाली....
जखम कोरुनी

तरी धरेवर तुझी सावली
झुलली होती
पुळणीच्याही ओठी महिरप
जुळली होती....

१९५८

# अशी तुझी ग

अशी तुझी ग प्रीत नव्हे
बाळतृणाच्या चिमटीची;
अळवावरच्या लाज लाजऱ्या
एका फिरत्या थेंबाची

अशी तुझी ग रीत नव्हे
उगाच दुखऱ्या चोचीची;
पंखामध्ये सैलपणाने
खुपत्या हळदी तोऱ्याची

अशी तुझी ग रात नव्हे
चोरचोरट्या नजरेची,
काजळभोळ्या डोळ्याकाठी
हिनकळणाऱ्या पाऱ्याची
अशी तुझी ग –

तुझीच केवळ
पहाट आहे तृप्तीची,
अबोल नाजुक शपथांची
फांदीवरच्या लाल फळावर
विरत्या नाजुक डंखाची

१९५८

## वाटेलाही फुटतात डोळे

अनोळखी पावलांची अनोळखी वाट
शब्दशून्य नूपुरांचा अर्थगूढ घाट
पिकलेल्या हौसेसाठी मोल चघळाया
विकलेल्या संगीतात रेंगाळते काया
जिव्हा एक व्याली तेथे शब्दांची बाहुली
खेळ झाला रंगाकुळ - रात काजळली
दिवे दिवे आक्रोशून मिटली कवाडे
आरासली पतंगाची पंखकटू झाडे
रेंगाळते फूल एक, हुंगते जमीन;
भाग्यवंतासाठी शेज राहिली नटून
धुपारती गाभाऱ्यात राखेतून पाही
म्हणे - देव पिंडीवर राहिलेला नाही
पुरे एवढेच शब्द उरलेले गाया
रक्तावीण लागेल का कुणासाठी माया ?
... अनोळखी वाटेलाही फुटतात डोळे
शपथ घे कुंती - तेही उंबऱ्यास कळे

१९५६

## कर्पुर शिशिराचा

विध्दपंख मी ... बघता बघता सांज दूर राही
हुंगायास्तव नक्षत्रांना बळ मजला नाही
गिरकी गिरकी घेउनि थकला नाद पारव्याचा
वाळूच्या अधरात थांबला अभंग मोत्यांचा
दूर कुठे हुंकार मंदिरी विठ्ठलास रोधी
मृदंग चुकला त्रिताल तरिही वळण राग शोधी
दीप दिशांचा उगा फडफडे उजळाया पुतळी
तरी मिठीतिल अभ्रामधली लय थांबुनि गेली
कशास रेखी अता पापणी तम कोरुन नक्षी
चुनडी चुनडी शिल्पगतीची भरते जळकुक्षी

अता विरावा शेल्यामधला मेघ भैरवीचा
आणि जुळावा साम, जाळुनी कर्पुर शिशिराचा

१९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नोंद दि: ......................

ॐ

पूर्णत्वात क्षिति-क्षितीज मिळते, भिंगावरी ये धुके
येते व्योम भरूनि शिल्पकृतिने-अभ्राकृती मावळे,
दुमडे काळ विराळ रंगबधिऱ्या गंधाकृतीने भरे
जाती भिन्न लयीत एकवटुनी मंद्र स्वरांची मुळे

घेताना तनु पाहिली नभफळे बाहूंत साकारुनी
तेजाची दुबळी भकासुनि फुले, नाभीत ये खिन्नता
कमळाचे जरि लाख ओठ सुकले-ओठास लावूनिया
अर्घ्ये साकळली जळात नुरली निःशब्द ही अस्मिता

होता नग्न दिशा धजे न दुसरी जोडावया बन्धने
मी, माझ्यातिल एक एक तुटती नाडीतली स्पन्दने
रेखी रेख मिळे विदेह घळती, बेताल गुंफूनिया
डोळ्यांच्या पुतळ्या जळी कवळती शब्दातली मैथुने

काळातीत कटाह मात्र भरतो रोमांच रंगातले
ज्यांच्या रम्य कडा पितात सगळी स्पर्शातली अंतरे
निर्द्वंद्वातिल नाद एक घुमतो अभ्रस्थ कायेतुनी
जाते पूर्ण स्वरूप भग्न बनुनी-पूर्णास शोधावया

१९५८

# अर्घ्य

बघता वळून मागे पुळणी कुठे स्थिरेना
अन् आर्द्र उमटलेले पदचिन्हही दिसेना
मी थांबले जरीं का गवसे न एक सूर
ही भैरवी कशाला घुमते अजून दूर ?
दूरात राहिलेला विझला न शुक्रतारा
नाही फुटे अजूनी रात्रीस या किनारा
मी जपुनि ठेवलेला शब्दार्थ एक मोठा
का व्यर्थ चोरिसी तू फसवून दोन ओठां
मी पाकळी खुडावी प्राशून रंग धुंदी
का जीभ दीन व्हावी या वेगळ्या सुगंधी ?
चुकलास तू असा का, खुडिलास तू पिसारा
मेघातल्या शिडाचा का आवरी पसारा ?
दे अर्घ्य तू सुरांचे ओढाळ अक्षरांना
ही वाट संपली रे ठेचाळुनी दिव्यांना !

१९५८

# गात्र गाथा

इथे मेघ झाले फुलांचे सभोती
तरी ओंजळी दीनवाणी झुरे,
दिशांच्या घरी आज बन्दिस्त वाटा
पिसांच्या कुशी ऊब आता नुरे

तरंगातली स्वप्नगाथा भरावी
हवा रिक्त प्याला धराया करी
दिवा फुंकता पापण्यांचे उसासे–
अधू होतसे स्तोत्र ओठांवरी

हवी भोगण्याला अशी हस्तरेषा
तुझ्या कंटकाने नको वाढवू,
जरी कंटकाचा हवा भार वक्षी
तुझ्या रिक्त नेत्री नको साठवू

विझाया हवा लाल तारा म्हणूनी
फुकावे किती अभ्र ओठांतुनी !
करी विभ्रमाची नसे मात्र लाली
दिली घेतली अर्घ्य दाने कुणी

कराया हवा रुक्ष आता किनारा
असो दूर डोळ्यांतली गलबते,
पुढे मागुती काळजाच्या फुलांना
असावी न वा हुंगण्याला भुते

अता वल्कलांच्या नव्या काळजीला
जपाया हव्या भग्न पर्णाङ्गना
हव्या गात्र गाथा म्हणायास जिव्हा
असो वा नसो ओठ या चुंबना !

१९५८

## पापणीत नभ जागे

पापणीत नभ जागे
थांब जरा काठावर ...
तोवरती खिन्न दिशा
झाकिन मी क्षितिजावर

थांब जरा ... डोहावर
घट्ट मिठी फांदीची
गुंफ त्यात कळ थोडी
झरणाऱ्या अश्रूंची

बळ दे रे उसवाया
शब्द सैल वीण तुझी ...
बोटातिल शून्य दिशा ...

दान जरी देणारच —
दे माझ्या रात्रीला
शीड तुझे
निखळाया काठ काठ
शिथिल ...पंगु वेणांचा !

१९५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ८६०९६ वि: ३३
क्रमांक १६५५ नों दि: १८१

# मंद मी मलूल वाट

मंद मी मलूल वाट वाळल्या तृणाची
सोबत मज सांजखूण भागल्या दिसाची

अंध मी, अधान्तरी युगात धुंडिताना
प्राणपंख तुटले तरि दान मागताना
खिन्न निशा उघडि दिशा फक्त काजळाची
मंद मी मलूल वाट वाळल्या तृणाची

एखादा प्राण इथे घेतसे निवारा
एखादी कूस इथे उजवते निखारा
कवणाचे दैव इथे दाबते उमाळा
वणव्यातुनि चुकला कुणि शोधतो जिव्हाळा

अवस इथे आसुसते आठवीत प्राची –
मन्द मी मलूल वाट वाळल्या तृणाची

इथून का फुटेल वाट श्रावणास येण्या
हिरव्याशा पालवीस सांगण्या कहाण्या ?
अंतरात प्रीतीची नीळ फेकताना
आळवील कोर कधी मालकंस ताना ?

वितळुनि नभ हृदयव्यथा कधी हरायाची ?
मंद मी मलूल वाट वाळल्या तृणाची.

१९६२

# माझा नवस मातीचा

माझे आसू पाहू नको असे तुला म्हणू कशी ?
विध्द पंखात जपते काळजी मी अशी पिशी

घेतील का हुंगूनीया दीपकळीच्या पाकळ्या
माझी काळोखाची कुपी–चंद्रजडित मोकळ्या ?

भोळ्या जिवणीची कोर तुझ्या क्षितिजाच्या आड
लपलेली का ग आई, अशी पांघरून वेड ?

तुझी नक्षत्रमोलाची कथा झाली अनोळखी
माझ्या सूरांसाठी झाली कंठी कोकीळ पोरकी

किणाणला होता तेव्हा चुडा श्रावणसरीचा ?
माझ्यापरी तरंगला ढग समोर हंसाचा ?

तेव्हा सोसले का तुला ओझे चांदण्याचे उरी
सूर झुकले होते का वनी ऐकूनी पावरी ?

माझ्या शिरव्याची घाई कशी सांगू आई, तुला
माझा नवस मातीचा मुळी वेढील नभाला !

१९६०

# तव अबोल हेतू सारे....

शिरव्यात कशी तू आज
आलीस दवाच्या दारी
घेउनी शुभ्र कानोसा
बुकुळीचा गंधकिनारी

निवळली कोर चंद्राची
त्या वेड्या क्षितिजापाशी
साठवीत हे नेत्रात
का पहाट उधळुन देशी...

तव नीलवर्ण नयनांचा
पेरुनी भुई चाफ्यात
का स्वप्न मयूर पिसारे
फुलविसी गूढ स्पर्शात

अडखळता पाऊल हळवे
या पहिल्या मृदुकिरणात
का भूपराग हिरवेसे
हरविसी तृणा-पर्णात

का कोरित ही नव किमया
आलीस धुंद शिरव्यात
तव अबोल हेतू सारे
का मला असे कळतात ?

१९५७

# इथे क्षितिज –

इथे क्षितिज जन्मता अमित दीप पुंजावले
नभात रुतली दिशा अतुट पंख भारावले
धरेत उसवावया हरवली अहा खिन्नता–
तिथे प्रणयदीपही उजवण्या हवी वर्तुळे

कुठे जलपऱ्यापरी वितळते जळी सावली
कुठे उभवती शिडे नयननील पर्णातली
अशा नितळशा मनी सजव आपुले जन्म तू
स्वरात नभ गुंतण्या नटव आपुले प्राण तू

नसेल दिसली धरा – उमलता कळी वादळी
नसेल दिसली करात तुझिया दिठी कर्दळी
तरी नुपुर शोधितीं – घुमव वीज नेत्रातली,
बनोत सगळी फुले सफल विश्व स्पर्शातली !

१९६३

## छंदी गालबोट

झिळमिळे पंखा
पहाट कळयांत
शेवग्याची झूल
रान गारव्यात

ओलावली झोप
दूर क्षितिजात
गोळा उशीवर
चांदणे पेंगत

आंबराईखाली
वेडी पिशी वेळ
फुंकरते सैल
गारव्या डोळयात

घरा घरटयात
ऊब उतावळी
वरखाली ऊर
पाचोळयाच्या तळी

झेपावून येते
सुरंगीचे मौन
झुकलेल्या जरा
फांद्या फांद्यातून

चंद्रगौरी कळ
लागते जराशी
छंदी गालबोट
अवेळी गालाशी !

१९५६

## रोम व्यथांचे –

सांज जराशी
थकुनि राहिली
पुलाखालुनी इंद्रधनूच्या

स्पर्श ढगांचा
गुंतुनि पडला
मऊ उबेवर क्षितिजावरच्या

थेंब लुसलुसा
जरा फिरकला
पिंपळपानांच्या श्वासांवर

पंख उन्हाचे
उघड-झाकले
संगमरवराच्या घुमटावर

माळ राहिला
पिकाळलेला
भलत्या भाविक खुळ्या सुखावर

तृप्तीमधली
आस राहिली
पाघळलेल्या भुईचाफ्यावर

वासनेतल्या
दमट वेदना
घुमत राहिल्या जाणिवेतुनी,

पिसाळलेले
रोम व्यथांचे
मात्र उगवले त्या सर्वांतुनी !

१९५६

# अर्धकुंभ

वाट उभी जवळ ... जवळ
होउनिया घटस्कंधा,
फुललेला मीही उरी
आठवीत हिमगंधा

सूर ... सूर ... शब्दांचा
वीजगती स्पर्श उरे,
गोकुळात मी कदंब ...
पैलथडी गान विरे

रात्र विरे द्राक्षांची
फेस फेस सुरईतुन
अर्धनेत्र मिटताना
तू न जवळ ... तू न दूर ...

तू न जवळ ... तू न दूर ...
किणकिणतो जलतरंग
विश्वाचा एक थेंब
दूर ठिबकतो अभंग

घटस्कंधा जवळ उभी
हिनकळते चंद्रबिम्ब
यमुनेच्या पाण्यावर
आज कसा अर्धकुंभ ?

१९५६

# सांज दाटली

सांज दाटली नदीत मंद हळद रंगली
दिशांत खोल प्राणज्योत अजुन जळत राहिली

वलय रंगता जळात नेत्र भिजत राहती
अबोधशा सुरावलीत शिल्पसाज वेढती

नील गूढ पापणीत अर्धरात दाटते
बिंदुबिंदुच्या मनात खोल गगन गुंगते

जळास लागता कळा-अधीर वाट होतसे
रान जाळिच्या कुशी विचित्र दुःख कोंदते

विश्व संपता तमात दीपपुंज फाकती
क्षितिज वेढते कवेत गूढ रम्य आकृती.

१९६१

# भ्रमंती

रक्तामध्ये असते नाते असे ऐकिले
रक्तावरती साय कशी ती उमटत नव्हती
अपुली छाया-केवळ अपुली-मोजुनि पाही;
दोन दिशांच्या मध्ये दिसली-छाया नव्हती

ईश्वर म्हणजे सागर तेव्हा असे मानले
तरिही त्याला काठच होता-माया होती,
अस्तित्वाचे जाळे बनते असे ऐकिले
त्यातुनि दिसली काळालाही क्षतेच होती-

क्षता-क्षतांच्या विश्वामध्ये-
अगणित अपुली जमती नाती
दोन इकडची-दोन तिकडची-
दोघांसाठी मात्र भ्रमंती.

१९६५

## गात्रात क्षितिज

नुक्तीच ओठाशी
चव जूळु यावी
अशी फुटली पालवी
पावसाच्या तळी

अभ्रबिलोरी उबेत
दुःख शेज सोशी
मंद मोतिया चुरात
रुग्णाईत उशी

सभोवती फक्त काच
खाच आकाशाला
हवी रक्तात खंगल्या
ऊब मावायाला

स्पर्शा स्पर्शाने घुमते
हवा मातीवर
तृप्ती बेभान डंखते
पंखा पंखावर

उठायचे आहे मला
आहे भिजायचे
गात्रा गात्रात क्षितिज
आहे भरायचे !

१९५८

## वेड

या तमाला वेड लागे
क्षितिजरेखा जोडण्याचे
रातवेलीला कवेतुन
वेड आहे वेढण्याचे

काळजीच्या काळजाला
खोल डोळे....खोल पाणी
काठवेडचा या जळाला
फक्त भिंगाची कहाणी

किर्र पंखी खिन्न सूर....
रक्त नाही पेटण्याला
गोठलेल्या कोवळयांना
शाप फांदीचा उशाला

....येथुनी प्रारंभ होतो
या तमाच्या जागण्याचा
दैव भाली झोपते अन्
अश्रुंना पडतात खाचा !

१९६०

# चित्र १

अधिरेसे चित्र....

कुणीतरी हाक मारल्या सारखे
हरीण झाडाचे झेपावून पुढे पळत सारखे
घुसमटलेला पाचोळयाच्या तळी चांदण्याचा ऊर
दु:सह मेघांना सारून खडक घालितो फुंकर

चांदणीचे पाप धुवून पण्यात निःशंक कमळ
पाण्यातील पाय काढून ध्यानस्थ बैसले कातळ
कुणा रमणीचे करुण उसासे उराशी जपत
निस्तब्ध कदंब उभा काठावर तोल सावरीत

चहूकडे फक्त द्वारे आभाळाची प्रकाश प्यालेली
दिशांची मिठी जाग आल्यापरी मोकळी झालेली
शेवटचा हात

फिरवाया उभी रात निळसर
पापणीचा हळू फिरतो कुंचला काठाकाठावर

१९५८

## चित्र २

विश्वाला पिळून काढलेले रंग
पेटणाऱ्या प्रत्येक क्षणाला देतात जन्म
रंगांचे पुंजके धरणीवर ठेवून
आकाश अभोगीच राहते
सात स्वरांना प्रसवून
मोकळी झालेली सूरवती
वाट पाहते आठव्या स्वराची

याच क्षणी तिच्या दृष्टीची लय
पकडून ठेव चित्रातील अवकाशात
तोल साधण्यासाठी.

१९६५

# सुखासिनी

कवटाळुनि वारा मी
प्रकाश होइन सारा
मी प्रकाश होइन सारा
स्वप्न.... स्वप्न खोवुनि
मी गुंतवीन पिसारा

अधांतरात देठ फुटे
फांद्यातुनि नभ उमटे
विभ्रमात उधळिन मी
द्राक्ष फवारा

गिरकी मी, मज भोती
फिरकी घन मेघांची
पिळवटून काढिन मी
दीप सूर सारा

कवटाळुनि वारा मी
प्रकाश होइन सारा
मी प्रकाश होइन सारा !

१९५९

## गौळणी उन्हाच्या

घुटमळते दुर्वांकित पाउल घाट पथावर
अन् डुचमळते सकाळ अर्धी जळकुक्षीवर
पदर ढाळुनी स्तनरेखांकित लहरीवरचा
कमळवेल झोपून निरखते तिळ मीनाचा
शपथ घालितो जरी कवडसा आभाळाची
तरी वळविते पान आपुली मान जराशी
चवथीच्या चंद्राची चघळत स्मृती रुपेरी
धुंद धुक्याचा अभंग चुकला ताल सावरी
कचभार उदविते तुळसमंजिरी हिरवाळीवर
दूर दूरचा करि घंटाध्वनि तिजला आतुर
स्वप्नी यमुना, कदंबशायी अभ्र-उशीवर
गुणगुणती गौळणी उन्हाच्या घाट-कुशीवर

१९५७

# एक लिहावी कविता

एक लिहावी कविता म्हणुनी
लिहू लागलो :
जमल्या तितुक्या ओळी पक्षी घेउनि गेले
लाटेवरती लाट फुटावी तैसे हसले
हसताना पण गात राहिले

एकाच्या विरहात उगविली
दुसऱ्याच्या स्वप्नांची झाडे
तिसऱ्याच्या पंखातिल नुसती बंद कवाडे

शब्दांची मग नभे बनुनिया उमटत गेली
किती ऋतूंचे झाले झगडे—

त्या झगड्यांची उभी आडवी
वस्त्रे विणली

वस्त्रांसाठी बनले मानव
मुखेहि तितुकी

एकाच्या नजरेत पाहिली दृष्टी माझी . . .
आणिक माझी कविता संपुनी गेली

१९६५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९६३०३
शाळा (प्रथम प्रत)

# मूठभर उरलेली

मूठभर उरलेली अजूनही रात
मोगरीच्या पांढऱ्यात आहे फेसाळत;
काळोखाच्या फांदीवर चव कोवळीशी
चाखायाला थांबलेली कोर वेडीपिशी.

उसवून काढलेला– अर्धा राहिलेला
कशिद्याचा सैल धागा उशीवर गोळा
असूद्याच आहे तसा; बेचवेल भारी
त्याच्यावरी भारलेली जादू गोरी मोरी.

निजसुरा विरंगुळा राहो विसंबून
चमेलीच्या दिठीतील– तिथेच रंगून
उसवली दवातील गूढशी सतार
झांजराचा तरी नको लावू तुझ्या सूर.

उघडीप सावळीशी जरा जराशाने.
उमलेल भावगीत थोडचा गारव्याने
अशावेळी अबोल्याची उसवावी गाठ
चोरट्याशा काळोखात बसलेली दाट !

१९५७

# हसत ओठ –

हसत ओठ मोकळे ...
सुरावलीत पेटतात
काळजातले दिवे.

असाच एक सूर ही –
हिमातल्या मधावरी
उठत साय चांदवे.

करात मात्र वादळे
जपत यौवनातले
शिल्पकोवळे थवे...

जपून लाव लोचने
अिथे मला ... तिथे तुला
रंग जाहली मने.

१९६४

# मधे हिवाळी रात्र

दोन किनाऱ्यावरती आपण
मधे हिवाळी रात्र
दुखऱ्या ज्योतीमधुनि वितळते
केवळ माझे गात्र

बर्फमनाची हसुनी गेलिस
हरवलेस अवकाश
दिलेस त्यातुन वेचुनि घेतो
माझे हळवे पाश

विजनातुनि मज कुणी अनामिक
घालित आज उखाणे
माझेही नभ माझ्याभोती
गाते स्वैर तराणे

जुन्या पुराण्या वाद्यांमधुनी
जगविन माझे शब्द
रात्र घुमे; पण तीहि अकल्पित
करिते काळिज विद्ध !

काळ म्हणावा — तरी हाताला
लक्ष लागती क्षते
बुझली नाहित वाऱ्यावरुनी
अश्रूंमधली भुते.

डोळ्यांचे तट कोसळताना
रक्त घळे पुष्पांचे;
निष्पर्णाचे शिशिर जागे
माझ्या भोति धरेचे !

१९६३

# चैत्रलज्जा

भिजत भिजत ये तू
चैत्ररंभेच्या पायाने
नभ वेढीत वेढीत
जरा लाजऱ्या हाताने
उन्हे शिम्पीत येतू
तुझ्या हळदी घाटाने
हळू नुपुर जोडीत
कुंद कळ्यांच्या काठाने

तुझ्या कमळी तोऱ्याची
हिर्वी आडवाट झुले
कटी रेखीत रेखीत
लाख पाकळ्यांचे डोळे
तुझ्या भरतीच्या खुणा
हळू वाकव पाण्यात
घट मधाचा झुकव
गोरी कर्दळ रेखित

अशी सलग सलग
घन गंधार्त होऊन
आज हवीस तू उभी
चैत्रलज्जा दवंळून !

१९५९

# ओंजळीत एक रात्र

ओंजळीत एक रात्र चंद्राने भरलेली
वलयडौल लचकतनू सळसळुनी लवलेली

आतुरसे आर्तभाव नेत्राच्या लावणीत
स्वप्नचिंब डुचमळती श्यामल घट व्योमतळी

गहननिळे दीपपंख पालवीत भारावुन
मग्न उभी गंधाच्या काठावर हिनकळून

अंकुरत्या स्वरवेली वेढुनिया देह धुंद
श्वासांच्या गगनातुन मिटलेली शब्दधून

ओंजळीत घेउनिया अर्घ्य असे रात्रीचे
दान इथे देताना—देणारी विरघळते.

१९६४

# आज तुला

गातात इथे हे हिरवे पिवळे रंग
ही सांज कशाला सजून आली सांग
बघ क्षितिजावरती लिहिली कविता कोणी
विरघळुनी गेले ढगात साखर पाणी

डोळ्यात रेखिली किनार रांगोळीची
का किनाऱ्यास या ओढ नव्या भरतीची ?
पलीकडे मधाचे ओठ कुणाचे पुसले
रंगार्त डहाळी कशास भरते पेले ?

दूरात तमाची विरळ पापणी जुळते
हे गगन धरेवर आज तुला कोसळते !

१९६४

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४८०७६ वि: गोराम
क्रमांक १८५५ नोंद दि: २८।२।८८

# पाप

पापण्यात किती पापे...
अरे, अवकाश फाटे
खोबणीच्या शिंपल्यात
मेघ मेघ दाटे

माझ्या सभोताली पापे
नक्षत्रांनी झोपविली
तरी अथांग निद्रेला
मने कुसळाची झाली

ईश्वराचे पापी डोळे
मिटतात मिटू द्यावे
शिंपीतल्या अंधाराला
लाख-लाख जन्म द्यावे !

१९६५

# अर्थ

तुझ्या फुलण्यातला
अर्थ उमगला मला
नाकारले कितीकही
डोळा डोळ्याला फुटला

तुझ्या फुलण्याचे वेड
जेव्हा नभाने घेतले
माझे हातही अपाप
नकळत पुढे झाले

आता पाण्याच्या मनाने
तारे मोजीत तू रहा
माझ्या सभोती राहून
मला सभोताली पाहा !

१९६६

# रक्तारक्ताच्या नात्याचा

पेरापेरात काळोखाच्या जर्द पहाट फुटली
चुरगळे पापणीत झोप, झिम्मड उरली
न्हाणुलेली कोर नभी तंग झाकिते गव्हाळे
अंग अंग वारियाचे भोगी केशरी डोहाळे
चोची-चोचीच्या जाळचात आला भर अभंगाला
थेंबा थेंबात शुक्राच्या मंद मंचक रंगला
काजव्यांची अळूमाळ नृत्यमैफल खंगली
बंद दालनांच्या आत शिळी कहाणी संपली
उरी जखम उघडी जपे धनी कवडीचा;
चार आण्याचा शेजार झाकी वेद कुंकवाचा

पोटी दिवसाच्या आता आहे मोल मृत्तिकेला
रक्ता रक्ताच्या नात्याचा आता संपेल सोहळा

१९५८

# मीरा

रंग येतो आसवांना
गंध लागे ओंजळीला
कंपनाचा सूर केव्हा
दान देतो पापणीला

मध्यराती मंदिराला
मेघमाला ताल देते
क्षीण इच्छेच्या कडेला
गंधजीवी जाग येते

धूप होतो मंद सूर
दीप गाते रंगदाणी
आरतीच्या आर्ततेला
साक्ष रात्रीची कहाणी

ही अशीं पूजेत मग्ना
मंचकावर रंग राणी
मंजिरीच्या पैंजणांनी
आळवी मीरा दिवाणी !

१९५७

# आता मीच माझे नभ

आता मीच माझे नभ
मीच झालो माझे तारे
उरी पेटत्या विजेचे
किती घ्यावेत निखारे !

अंतरता माझी धरा
अभ्राअभ्रात संपलो
सूर किनाऱ्यास देण्या
मंद सूरच जाहलो

माझी फुले हरवावी
तिथे क्षितिज वसावे
दान घेण्या देण्यासाठी
तिथे रात्रीनेही यावे

क्षण एक धरेवर
तुझ्यासाठी उसवावे
आता मीच माझे नभ
तुझ्या रूपात पहावे !

१९६२

६०१६ ९६५५ ९८

# अश्रुपंख

मंदशा तमात सांज
डोळियांत वेदना
हृदय गोठते धुक्यात ;
आसवात कल्पना

रात्र जन्मता इथे
अनंत दाट कोंदतो
गभीर झाकल्या दिशांत
खिन्न नाद गोंदतो.

एकले मलूल फूल
अभ्रभार सोसते
प्रश्नगूढ दर्पणात
बिंब बिंब ओतते

वाकता मनात बोल
तोल झुकत राहतो;
खोल फुंकता तळास
अश्रुपंख गोठतो.

१९५८

# विद्ध शय्या

दिशाहीन भोवऱ्यात सापडलेली
ही दैवाची वर्तुळे
केव्हापासून गिळताहेत अनंताचा आवढा –
घोटाखाली जळणारी
ही दर्याची जाग . . .
मी म्हणतो : तिची आग
राखेत आहे.
रक्तपिपासू मायेला जोपासणारे
हे वणवे कोणाचे ?
अटी तटीची मिठी घालून
जुळणारे माझे हात
का राहतात अधांतरी - अंधारात ?
पंखात विझलेल्या थेंबाचे
बर्फ होत नाही –
म्हणून मी जागा आहे .... जागवतो आहे
विद्धशय्या . . .
मरणाचे पीस हुरळते गालावर
तेव्हा मला कळते की
काचेने वेढलेली वेदना
अश्रूंतच विरघळणारी आहे.
मी फक्त मागणार आहे
अभ्रदान : एका रात्री एवढे

१९६२

# बेहोष रात्र

बेहोष रात्र कबूल झाली :
पानन् पान जागे झाले
क्षितिजाच्या कवेमध्ये
गात्र गात्र पेटून आले
जळी वलय हरवताना
विश्व सारे वलय झाले
इथे सूर ... सूर
किनाऱ्यावर गोकुळ आले.

आकाशाच्या जळी गर्भ
रंग सभोताली ओला;
मेघांवरती दाटून साय
हुंदकाही उतू आला
वाळूपरी बोटातून
थंडी थोडी गळून गेली
उष्टया पापणीत खोल
पहाटेची बीज आली

बेहोष रात्र होय म्हणाली
पानन् पान जागे झाले
एकान्ताची खडी साखर
वितळवून नभ गेले.

१९६३

# आज मी माझ्यात नाही

आज मी माझ्यात नाही, आज मी माझ्यात रे
क्षीण झाल्या आज वाटा, आणि तू दूरात रे

चंद्र होता धुंद गात्री क्षितिज होते पेटले
सोबतीला श्वास होते आणि डोळे लाजरे

स्वप्नवाटा वेढलेल्या सावल्या होत्या अधाशी
केशरी स्पर्शात तेव्हा रंगलेले गंध वारे

मी अशी होते, सभोती रात्र होती जागती
तू दिलेले शब्द होते गुंतुनी सूरात रे

आज मी माझ्यात नाही, आज मी माझ्यात रे
क्षीण झाल्या आज वाटा, आणि तू दूरात रे

१९६६

## प्राणांची प्रार्थना :

एका घासाच्या दोन कथा
साऱ्या निळ्या काळ्या व्यथा
मनाचे वाढते आकार अंगाखांद्यावर खेळवून
ही बसली दुःखांच्या जवळ... इथून तिथून...
आपुले आपण आभाळ चाटत
भाळाला विचारीत प्रश्न सात जन्मांतले

: कुशीतील त्वचेच्या साली वाळल्यावर
प्राणाच्या किती पायऱ्या चुकतील ?
दाटीवाटीने जमणाऱ्या अभ्रांपरी
इच्छांचे अवकाश केव्हा भरेल ?
प्रश्नांच्या माडीवर माडी चढवीत
ती बसली हस्तरेषा वाढवीत
तिला उमगले नाही की
प्राणांच्या जवळ नदी प्राणांचीच
काठाकाठावर फुले फुलांचीच :
अवकाश कितीही उसवले
तरी क्षणांची माळ जुळायचीच

तिला उमगले नाही की
आपल्या प्राणांची प्रार्थना
आहे आपल्या पायाशींच !

१९६६

# मृत्यूच्या पंगू चाली

शब्दाला म्हणतो
फेक जरा घननीळ . . .
रुंजती गाली
गुंगीच्या साखर ओळी –

मौनाला म्हणतो
ओत नभाची नक्षी
पसरुनी धून
तालावर फुलती प्राण

अन व्यथेस म्हणतो
उघड जरासे काठ
गुहेच्या खाली
मृत्यूच्या पंगू चाली !

१९६६

# पहिलेपण

माथ्यावर उन्ह गडे ऽ
पायाशी उलगडते
प्रश्नव्यथा
रात्रीच्या सावलीत
गारपणे विव्हळत्या.

माथ्यावर उन्ह गडे ऽ
शब्दांच्या मृगजळात
हिनकळते
त्या ओल्या पापणीत
हिरवेसे जग झुलते.

माथ्यावर उन्ह गडे –
थोडेसे चाखताच
नजरेतुन
दावितात स्मितराशी :
दात्याचे पहिलेपण.

१९६६

# असले जगणे देई देवा

धार्मिक ग्लानी असते उपदेशाच्या ओठी
श्रद्धेची बुब्बुळे सडावी तैसे जगणे,
केवळ ओठा ओठांची भाषा : शुद्ध तराणे
गलित विकल देहातुनि फुटती शापावाणी.
असेल जर का रात्र यमाची –
सोडुनि नावा स्वस्थ वहावे
पायी नुपुर बांधुन नर्तुन घ्यावे
देव्हाऱ्यातुन ठेवुन श्रद्धा
मांडीवरती ताल धरावे :

असले जगणे देई देवा
मरण्या पुरते !

१९६५

## अन्यायाच्या महासागरात

अन्यायाच्या महासागरात
बुडालेले जिद्दींचे थवे
ज्यात आत्म्याचा आत्म्यावर विश्वास नाही…
दुखणाऱ्याचा आत्मा
दुखविणाऱ्याला म्हणतो,

'माझी नग्नता तरी
कबंधाभोवती दे वेढून'
काही पाळीव आत्मे हळूच हसतात
तुरुंगाच्या उघड्या खिडक्या हसतात जशा
बेवारशी अत्म्यांनीही
बंड उभारलेले असते
त्यांनीच न पाहिलेल्या स्वर्गात;
पण शीड लोटताना
डोलकाठी चुकचुकावी
तसा चुकचुकतो त्यांचा
प्रणयी रंग…

बेताल गोडीला अखेर
कटु अदृष्ट मिळालेले असते
तेवढाच घोट घ्यावासा वाटतो
मग ही आत्म्यांची भाषाच
मुकी होऊन बोलते
आंतरिक ओळी…

दोन सृजनाच्या...
दोन वेदनांच्या...
असहाय मातीत विजेचा लोळ
उमटावा तशी
सुनीते उमटतात फुलाफुलांच्या ओळीवर
आणि आत्मा—

आत्म्याचेच गीत गातो
दोन सुनीतांवर पाय ठेवून.

१९६५

## गीताचे सुख

अभ्र वेचण्या निरभ्र झालो
शुभ्र जाहल्या गात्रकळ्या
दीपभान मन वलयामधुनी
उधळित गेले स्वर पुतळ्या

कंठ कंठ मी विणीत असता
हळू डंखते नादपरी
सूर कोकिळा उंच पांगल्या
कृष्णपंख घेऊन शिरी

सुरंग पाहुन निशिगंधाची
चूळ फेकली गहिवरुनी
ओंजळीतली पहाट अपुले
अर्घ्य देतसे दहिंवरुनी

ओंजळीतले अर्घ्य घ्यावया
विश्वचि अवघे ओंजळले
थेंब थेंब अन् झरता झरता
निर्मळ झाले नयन तळे

पायाखाली फक्त विजेची
रेख निखळते क्षणा क्षणा
मी गीताचे सुख भोगतो
स्मरुनि दिशांच्या अधर खुणा !

१९५७

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ............ दि: ............

# तम केव्हाचे

भाळावरची बुडली रेषा
तमात, आणिक सरली ग ऽ

जरी निखळल्या लक्ष तारका
डोह मनाचा कळला ग ऽ

मोती पेटुनि रक्त उजळले
क्षण क्षण झाला उजळ कधी

कळीमोकळ्या पानावरचा
नाहि ठिबकला भार कधी

प्राजक्ताच्या तळास केव्हा
सुगंध कण्हत बसलेला

जरी हरवली गात्रे गात्रे
शिंपित डोळा सुकलेला

गर्भाच्या आरतीस केव्हा
नुरते तम अन् नुरे दिवा

मरण सांगते अंधाराच्या
डोळ्यांतुनही हवा दिवा

अता कशाला बुडबुडयावरी
हंस कोरिसी अभ्रांचा ?

तम केव्हाचे गोठुनि आहे
हवा सोस ग छिन्नीचा !

१९५७

REFBK-0016303
REFBK-0016303

## भिक्षा

तिच्या शब्दांचा अर्थ आभाळाएवढ्या डोळ्यांत विझलेला
पापण्यांची मूठ गच्च मिटून रात्र रात्र गोठलेला

रडताना सागर जगले.... व्यथेखाली पंख झाकीत
उचल म्हणतो आपलीच सावली... पेटवून देहाच्या पणतीत

छातीवरच्या स्तनांसारखे भविष्याचे बेडर डोळे
अतीतावर चढलेत रे क्षितिजाचे पाय लुळे...

एवढ्या शब्दांना पुरेल का रे हे एवढेसे थडगे ?
पावलांची पूजा ओसरताच दैव होईल का रे जागे ?

माझ्यासाठी तेवढीच तिने आखली होती कक्षा
शब्दांनाच हात फुटतील तर मागेन म्हणतो भिक्षा!

१९६६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १९३०३
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २८०१६ दि: ७।१२४
क्रमांक १८५५ नों: दि: १८।१।८८